महामंडलेश्वर
स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे
सत्संग - प्रवचन

# संगतीचा प्रभाव



- प्रकाशक -

**ॐ परमानंद प्रकाशन**
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**
भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)
मो.ः

किंमत ः दहा रुपये (१०/-)

# निवेदन

संपूर्ण समाज सुसंस्कारीत व्हावा, सुखी, समाधानी, निर्व्यसनी व्हावा, या दृष्टीने श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांचे नेहमी प्रवचन चालू असते.

व्यक्तीच्या जिवनात जे दुःख, अशांती निर्माण होते. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे ''संगती'' हे होय.

संगतीनेच जिवनात दुःख-सुख, पाप-पुण्य, सद्‌गती-दुर्गती, स्वर्ग-नर्क प्राप्त होतो. असे असले तरीदेखील बऱ्याच जिवांना चांगल्या-वाईटाची, सज्जन-दुर्जनाची ओळख होत नाही. त्यामुळे काही तर दुर्जनांनाच सज्जन समजून दुर्जनाची संगती करून जिवंतपणी दुःख व मृत्यूनंतर नर्काच्या गतीला जातात. अशी जिवाची दुर्दशा होऊ नये या दृष्टीने सज्जन, दुर्जनाची ओळख व्हावी या सद्‌हेतूने स्वामीजींचे **''संगतीचा प्रभाव''** हे प्रवचन पुस्तक रूपाने आपल्या हातात देतांना आम्हास अत्यंत आनंद होत आहे.

**- प्रकाशक**



**दुर्जनाच्या संगे दुर्जनची होय । पाहे अभिप्राय सहज तो ।।१।।**
**हिंगाची संगती लागली कापूरा । स्वगुन तो खरा हारपला ।।२।।**
**ताकाचे संगती नासले ते दूध । भांग करी मुग्ध जीव क्षणे ।।३।।**
**बहेणी म्हणे संग आपूलेसे करी । म्हणोनी विचारी साधूजणा ।।४।।**

या जगात काहींचे दुःखी जीवन बघितल्यानंतर मनामध्ये अशी शंका निर्माण होते की, असे दुःख नरकात देखील असेल किंवा नाही? त्याच प्रमाणे काहींच्या जीवनामध्ये जो आनंद, सुख, समाधानाची स्थिती दिसते. ते बघितल्यानंतर देखील मनात शंका निर्माण होते की, एवढे सुखसमाधान स्वर्गात देखील असेल किंवा नाही?

अशा प्रकारे काहींच्या जिवनात नरकापेक्षाही महाभयानक दुःख तर काहींच्या जीवनात स्वर्गापेक्षाही जास्त सुख, समाधान, शांतता असण्याचे कारण काय? असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होतो. या प्रश्नाचे उत्तर देतांना महापुरुष, साधूसंत, ऋषीमुनी असे सांगतात की, सुख-दुःखाची अनेक कारणे असले तरी एक प्रमुख कारण म्हणजे संगती हे होय.

संगतीनेच पाप घडते व संगतीनेच पुण्यही घडते. म्हणजेच पाप-पुण्य, सुख-दुःख, लाभ-हानी, जय-पराजय, सत्कर्म-दुष्कर्म, सद्‌गती-दुर्गती हे सर्व संगतीमुळेच होत असते.

जसे आत्ताच ज्या संत बहिणाबाईच्या अभंगाचे उच्चारण केले त्या अभंगाच्या प्रथम चरणामध्ये संत बहिणाबाई म्हणते की, *''दुर्जनाच्या संगे दुर्जनची होय.''* म्हणजेच जो दुर्जनाची संगती करतो तो एक दिवस म्हणजेच कालांतराने दुर्जन बनल्याशिवाय राहत नाही. कारण संगतीचा परिणाम त्याच्यावर झाल्याशिवाय राहत नाही. त्याच्यासाठी

जसे उदाहरणे दिले की, हिंग, ताक, भांग या जड पदार्थांचा देखील दुसऱ्यावर परिणाम होतो.

जसा दुर्जनांचा परिणाम होतो त्याच प्रमाणे सज्जनांचा, संतांचा देखील दुसऱ्यावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. जसे संत बहिणाबाईने अभंगाच्या शेवटच्या चरणामध्ये सांगितले की, *''बहेणी म्हणे संग आपूलेसे करी । म्हणोनी विचारी साधुजना''* ।। साधूसंतांचा चांगल्याच्या संगतीचा परिणाम जिवनावर झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून साधू-संताच्या सानिध्यात राहिले पाहिजे.

अशा प्रकारे थोडक्यात या अभंगाचा भावार्थ समजून घेतल्यानंतर जीवन चांगले किंवा वाईट जे संगतीमुळे घडते, त्या संगतीबद्दल म्हणजेच संगतीच्या परिणामाबद्दल अजून जाणण्याची इच्छा जिज्ञासुंच्या मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही.

बरेच जिज्ञासू, मुमुक्षू, साधक, विचारतात संगती किती प्रकारची असते? त्यांचा जीवनावर कसा परिणाम होतो? असे अनेक प्रश्न विचारत असतात.

साधारणतः असे सांगता येईल की, पापी, दुरात्मा, दुष्ट, दुर्गूनी, व्यसनी अशांची दुर्जन संगती आणि पुण्यात्मा, सदाचरणी, निर्व्यसनी साधूसंताची म्हणजेच सत्कर्म करणारे अशांची सत् संगती अशी दोन प्रकारची प्रामुख्याने संगती असते.

म्हणजेच या जगात सज्जन व दुर्जन अशा दोन प्रकारच्या व्यक्ती असतात. त्यांचे त्याच प्रकारे दोन प्रकारचे कर्म देखील असतात. जसे

संगती प्रकार :

**सकृत न सुकृती परिहरई । कपट न कपटी निच ।**
**भरत सिखावन देई चले । गिधराज मारिच ।।**

या जगात काही सुकृत म्हणजेच चांगले कर्म, सत्कर्म करणारे



असतात. तर काही दुष्कर्म, वाईट कर्म, कपट कर्म करणारे निच कपटी असतात.

सत्कर्म करणारे शेवटच्या क्षणापर्यंत जसे सत्कर्म परोपकार आदि करत राहतात त्याच प्रमाणे निच कर्म करणारे निच कपटी असतात.

सत्कर्म करणारे शेवटच्या क्षणापर्यंत जसे सत्कर्म परोपकार आदि करत राहतात त्याच प्रमाणे निच कर्म करणारे देखील शेवटच्या क्षणापर्यंत निच कर्म करत राहतात.

जसे आपण ऐकले असेल की, भगवान राम, लक्ष्मण, सींता ज्या वेळेस पंचवटीमध्ये राहत होते त्या वेळेस गिध्धराज जटायू पहारा करण्याचे कार्य करीत होता. राम, लक्ष्मण कुटियात नाही कुटियात केवळ एकटी सीता आहे. ही संधी साधून दुष्ट रावण ज्या वेळेस सीतेचे हरण करायला लागला त्या वेळेस गिध्धराज जटायू त्या ठिकाणी धावून आला. रावणाच्या तावडीतून सीतेला सोडविण्यासाठी तो प्राणपणाने लढत राहिला.

शेवटी रावणाने त्याचे पंख छाटल्यानंतर जटायू रामनामाचा उच्चार करत रक्ताच्या थारोळयात मरनासन्न अवस्थेत पडला. परंतु त्याने प्राणत्याग केला नाही. रामलक्ष्मण सीतेचा शोध करत त्या ठिकाणी आल्यानंतर सीतेला रावण दक्षिण दिशीकडे घेऊन गेलेला आहे, हा समाचार सांगितला. त्यानंतर त्याने प्राण त्याग केला. म्हणजेच सीतेला सोडविण्यासाठी मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत जटायू लढत राहिला व सीतेचा समाचार सांगून त्याने प्राण त्याग केला. अशा प्रकारे जे पुण्यात्मा असतात ते शेवटच्या क्षणापर्यंत सत्कर्म, त्यागत नाही. कारण *'' सुकृत न सुकृती परिहरई ''* सत्कर्म करणारे शेवटच्या क्षणापर्यंत म्हणजेच मरेपर्यंत सत्कर्म सोडत नाही.

जसे सत्कर्म करणारे शेवटच्या क्षणापर्यंत सत्कर्माचा त्याग करत नाही त्याच प्रमाणे *'' कपट न कपटी निच ''* छळ, कपट करणारे निच कर्म

करणारे शेवटच्या क्षणापर्यंत निच कर्माचा त्याग करत नाही.

जसे आपणास माहींत असेल की, विश्वामित्रऋषी जगाच्या कल्याणासाठी यज्ञ करत होते. त्या यज्ञामध्ये मारीच, सुबाहू आदी राक्षस येऊन विघ्न करत होते. विश्वामित्रऋषींच्या प्रेरणेने भगवान राम त्या यज्ञाचे रक्षण करावयास लागले. यज्ञाचे रक्षण करत असतांना मारीच अदी राक्षस विघ्न करण्यासाठी आले. त्या वेळेस भगवंताने मारीच वर दया केली. म्हणजेच रामाने त्याचा प्राण न घेता विना फराचा बाण मारला की जेणे करून त्याचा प्राण गेला नाही व तो समुद्राच्या पार जेथून आला होता तेथे त्या लंकेत जाऊन पडला.

अशा प्रकारे ज्या मारीच राक्षसाला रामाने जीवदान दिले त्याच मारीचने रामाचा काही उपकार तर मानला नाही उलट कांचन मृगाचे रूप धारण करून सीताहरण करण्यासाठी रावणाला मदत केली. छळ, कपट करून त्याने रामाला सीतेपासून दूर नेले. उद्देश हा की, इकडे रावण सीतेला घेऊन गेला पाहिजे.

सीतेपासून छळ, कपट करून ज्या वेळेस त्याने श्रीरामाला खूप दूर नेले व ज्या वेळेस श्रीरामाचा बाण त्या मारीचला लागला. आता त्याचा मृत्यू होणार अशा शेवटच्या क्षणीदेखील त्याने कपट सोडले नाही. तो मारीच श्रीरामाच्या आवाजात ओरडला की, हे लक्ष्मणा धाव ! धाव !

अशा प्रकारे लक्ष्मण सीतेला एकटी सोडून श्रीरामाकडे गेले त्यावेळेस इकडे रावणाने सीतेचे हरण केले. अशा प्रकारे ज्या मारीचवर श्रीरामाने जीवदान देऊन उपकार केले होते. त्या मारीचने शेवटच्या क्षणापर्यंत छळ,कपट सोडले नाही.

सांगण्याचे तात्पर्य की, पुण्यात्मा चांगला व्यक्ती शेवटच्या क्षणापर्यंत सत्कर्म जसे सोडत नाही. त्याच प्रमाणे पापात्मा, वाईट व्यक्ती शेवटच्या क्षणापर्यंत वाईट कर्म सोडत नाही. म्हणून एक म्हण देखील आहे की,



*''जीत्याची खोड मेल्याशिवाय जात नाही.''*

म्हणून काही मनुष्य, पशू, पक्षी, किट, पतंग यांचा स्वभाव ठरलेला असतो. त्यांच्या स्वभावात फरक होत नाही. जसे कबीर महाराज म्हणतात..

**पापी पुण्य न भावही, पापही बहूत सुहाय ।**
**माखी सुगन्धी परिहरै, जहाँ दुरगंध तहाँ जाय ।।**

काही असे पुण्यात्मा असतात की, ते रात्रंदिवस पुण्य परउपकार करत राहतात. तर काही असे पापी व्यक्ती असतात की, ते रात्रंदिवस पापही पाप करत राहतात. अपकारही अपकार करत राहतात. त्यांना पुण्य मुळीच आवडत नाही. तर त्यांना रात्रंदिवस पापच करणे आवडते.

जशा दोन माशा असतात. एक घाणीवर, सडलेल्या प्रेतावर, दुर्गंधीवर बसणारी डेंग माशी व दुसरी फुलावर बसून मकरंद, सुगंध सेवण करणारी मधमाशी. मधमाशीला जर मकरंध मिळाला नाही तर ती मरून जाते. परंतु ती घाणीवर बसून घाण सेवन करत नाही. त्याच प्रमाणे घाणीवर बसणारी माशी सुगंध, मकरंध सोडूण घाण व दुर्गंधच सेवन करते.

माशांमध्ये जशा सुगंध व दुर्गंध सेवन करणाऱ्या वेगवेगळया जाती आहे त्याच प्रमाणे मानव प्राण्यामध्ये देखील पाप व पुण्य करणाऱ्या वेगवेगळया जाती किंवा स्वभावाच्या व्यक्ती असतात. म्हणजेच काही स्त्री पुरुष असे असतात की, त्यांना पुण्य, दान, धर्मपालन, भक्ती, परोपकार, सेवा करने आवडते तर काहींना पाप, चोरी, अधर्म, अपकार, हिंसा आदी आवडते.

समाजामध्ये वावरतांना याचा नेहमी अनुभव येतो. बऱ्याच वेळेस ज्या गावात, भागात सत्संग-प्रवचन चालते त्या वेळेस भक्त, पुण्यात्मा आपले गाव, भाग, तालुका, जिल्हा ऐवढेच नव्हे तर प्रांत सोडून येतात. परंतु काही अभागी पापात्मा जवळ असून, झोपा घेतात किंवा निंदा करत

बसलेले असतात. जशी घाणीवर बसणारी माशी जवळच्या फुलाचा मकरंधाचा लाभ घेत नाही, तशी त्या पापी लोकांची अवस्था असते.

सांगण्याचे तात्पर्य जीव, जंतू, पशू, पक्षी, चर, अचर सर्व चांगले वाईट, पापी-पुण्यात्मा, सुजात-कुजात किंवा थोडक्यात म्हणजे दैवी संपदा व असूरी संपदा अशा दोन वेगवेगळ्या भागात विभागलेले आहे. त्यानंतर येणारा जीवात्मा ज्याच्या संगतीत जातो तो तसा झाल्याशिवाय राहत नाही. म्हणजेच संगतीचा परिणाम जीवावर झाल्याशिवाय राहत नाही. संगतीचा कसा परिणाम होतो हे सांगण्यासाठी उदाहरण दिले जसे..

## संगतीचा परिणाम :

**जो जैसी संगती करी, तै तैसी फल लीन ।**
**कदली सीप भुजंग मुख, बुंद एक गुण तीन ।।**

एकाच ढगामधून निघणाऱ्या पाण्याच्या थेंबापैकी एक थेंब कदली म्हणजेच कमळामध्ये पडल्यानंतर त्यापासून मकरंद व सुगंध निर्माण होतो. जो सेवन करण्यासाठी भ्रमर कितीही दूर असला तरी ते सेवन करण्यासाठी येतो व सर्व देहभान देखील विसरून जातो.

त्याच ढगामधून निघालेला पाण्याचा एक थेंब सीप म्हणजेच शिंपल्यामध्ये पडल्यानंतर त्यापासून मोती तयार होतो. जो राजाच्या, भगवंताच्या मुकुटामध्ये म्हणजेच मस्तकावर शोभायमान होतो.

त्याच ढगामधून निघालेला पाण्याचा एक थेंब भुजंगमुख म्हणजेच सापाच्या मुखामध्ये पडल्यानंतर त्यापासून विष निर्माण होते. की, ज्या विषामुळे साप चावज्यामुळे मृत्यू होतो.

संगतीचा कसा परिणाम होतो हे सांगण्यासाठी संत तुलसीदास महाराज देखील म्हणतात...



**तुलसी भलो, सुसंग ते पोच कुसंगती सोई ।**
**नाऊ किनरी तीर असि लोह बीलोकुहू लेई ।।**

सुसंगती किंवा कुसंगती जशी मिळाली असेल तसा त्या सुसगंतीचा किंवा कुसंगतीचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. जसे...

एकाच लोखंडाचा एक तुकडा नाऊ म्हणजेच नावेला लावल्यानंतर, वापरल्यानंतर नावेचा जो तारण्याचा स्वभाव किंवा गुणधर्म त्या लोखंडामध्ये येतो. म्हणजेच ते लोखंड नावेच्या लाकडाच्या फळयांना एकमेकांना जोडून ठेवते व नदीतून पार नेण्यासाठी तारण्यासाठी एक प्रकारे मदत करते.

त्याच लोखंडाच्या एका तुकड्याच्या तारा बनवून किनरी म्हणजेच सीतार वाद्याला वापर केला तर त्यापासून मधूर आवाज निघतो की, जो ऐकून जीवाला आनंद होतो.

त्याच लोखंडाच्या एका तुकडयापासून तीर म्हणजेच बाण बनविला तर तो बाण प्राण्याचा जीव घेतो. म्हणजेच तो बाण लागल्यानंतर मृत्यू होतो.

म्हणजेच एकाच ढगामधून निघालेले थेंब कमळामध्ये, शिंपल्यामध्ये, सापाच्या मुखात पडल्यानंतर संगती प्रमाणे वेगवेगळे प्रभावकारी होतात.त्याच प्रमाणे एकाच लोखंडाचे तुकडे नाव, सीतार, बाण यामध्ये वापरल्यानंतर तारणे, आनंद देणे, मारणे असे वेगवेगळे गुणधर्म त्यांच्यात येतात. त्याच प्रमाणे जड पदार्थात एवढे गुण येतात तेव्हा जीवावर संगतीचा परिणाम तर झाल्याशिवाय राहूच शकत नाही. ज्ञानी महापुरुष सांगतात...

**गुणीयण संग गुण बढे, जड संग जड कहलाय ।**
**जो जाकी संगती करे, वो वैसा ही हो जाय ।।**

जो गुणवाण असेल ज्ञानी असेल तर अशा गुणवाण ज्ञानी व्यक्तीच्या संगतीने गुण व ज्ञान वाढते. परंतु जो जड म्हणजेच अज्ञानी असेल तर तो त्या अज्ञानाच्या संगतीने अज्ञानच राहतो. म्हणजेच जो जशी संगती करतो

किंवा ज्याची संगती करतो तसाच तो ज्ञानी किंवा मूर्ख बनतो.

उत्तमाच्या संगतीने कसे उत्तम बनल्या जाते याचे अजूण एक उदाहरण

**निचहू उत्तम संग मीले, उत्तम ही हो जाय ।**
**गंग संग झील मिलहू, गंगोदकके भाय ।।**

कितीही लहान म्हणजेच नाल्यातील पाणी असेल ते जर गंगेमध्ये मिळाले तर गंगेसमान पवित्र गणल्या जाते. त्याच प्रमाणे ज्याला उत्तमाची म्हणजेच चांगल्याची, पुण्यवाणाची, साधू संतांची संगत मिळाली तर तो देखील एक दिवस पुण्यवाण झाल्याशिवाय राहत नाही.

संगतीचा जीवनावर कसा परिणाम होतो हे सांगतांना एका अभंगामध्ये संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात...

**दुर्जनाच्या संगे दुर्जनत्व प्राप्ती ।कैसी त्या विश्रांती साधकासी ।।**
**सज्जण संगती करीता तेची रुप ।आनंदाचा दीप बानताती ।।**

कितीही भाविक असेल भक्त असेल साधक असेल तरी परंतु जर तो दुर्जनांच्या संगतीत गेला तर तो दुर्जन झाल्याशिवाय राहत नाही. तो दुर्जन झाल्यानंतर त्याला कधी सुख, समाधान, शांततेची प्राप्ती होऊ शकत नाही.

दुर्जनाच्या संगतीने जसा दुर्जन होतो व दुःख ही दुःख भोगतो त्याच प्रमाणे सज्जनाच्या संगतीने सज्जन होतो. त्यामुळे त्याला सुख, समाधान, शांततेची, आनंदाची प्राप्ती होते.

संत बहिणाबाई म्हणते की, '' *दुर्जनाच्या संगे दुर्जनची होय* '' त्याच प्रमाणे संत ज्ञानेश्वर महाराज सांगतात की, '' दुर्जनाच्या संगे दुर्जनत्व प्राप्ती '' म्हणजेच दुर्जनाच्या संगतीने दुर्जन झाल्याशिवाय राहूच शकत नाही. दुर्जनाची संगतीच काय परंतु दुर्जनाने वापरलेली एखादी वस्तू जरी आपण वापरली तरी आपली बुद्धी दुर्जन झाल्याशिवाय राहूच



शकत नाही. जशी भागवतामध्ये परिक्षित राजाची कथा येते की,

परिक्षित राजा म्हणजेच पुण्यश्लोक पांडवांच्या वंशातील अभिमन्यूचा पुत्र. कौरवांच्या पक्षातील अश्वत्थामाने पांडवांचा निरवंश व्हावा म्हणजेच पांडवांच्या वंशामध्ये कुणीच जिवंत राहू नये म्हणून अश्वत्थामाने गरोदर स्त्रियांच्या गर्भावर देखील ब्रम्हास्त्र सोडले. त्या वेळेस अभिमन्यूची पत्नी उत्तराने भगवान श्रीकृष्णाचा धावा केला. भगवान श्रीकृष्णाने आपल्या हातात सुदर्शन चक्र घेऊन त्या गर्भस्थ बालकाचे रक्षण केले.

त्या बालकाचा जन्म झाल्यानंतर तो बालक प्रत्येकाचे परिक्षण करायचा की, गर्भामध्ये सुदर्शन घेऊन ज्वालेपासून माझ रक्षण कोण करत होते. म्हणून त्या बालकाचे नाव ठेवले परिक्षीत.

अशा प्रकारे पुण्यवाण पांडवांच्या वंशातील भगवंताने ज्याचे रक्षण केले तो परिक्षीत राजा झाल्यानंतर नितीने, न्यायाने, मर्यादेने, धर्माने राज्य करायला लागल्यानंतर एक दिवस अरण्यात शिकार करण्यासाठी गेला. एका हरणाच्या पाठीमागे लागून खूप मोठ्या अरण्यात चालत गेला. तहानेने व्याकूळ झाल्यानंतर एका आश्रमात तो पाणी पिण्यासाठी गेला. त्या आश्रमात एक ऋषी ध्यानस्थ बसलेले राजाने बघितले. राजाने त्या ऋषीला पिण्यासाठी पाणी मागितले. परंतु ते ऋषी ध्यानस्थ असल्यामुळे राजाचा आवाज त्यांनी ऐकला नाही. त्यामुळे त्यांनी राजाला या बसा पाणी प्या असे काहीच म्हणले नाही. त्यामुळे राजाला आपला अपमान झाल्यासारखे वाटले. त्यांच्या मनात क्रोध निर्माण झाला. त्या क्रोधावस्थेत त्यांनी बाणाच्या टोकाणे एक मेलेला साप उचलला व ऋषीच्या गळयात घालून दिला.

ऋषीच्या गळयात मेलेला साप परिक्षीत राजाने घातल्याचा समाचार त्या ऋषीच्या पुत्राला कळाल्यानंतर त्याने सात दिवसात तक्षक नावाचा साप परिक्षीत राजाला दंश करेल व त्या सर्पदंशाने राजाचा मृत्यू होईल,

असा शाप दिला. शापाप्रमाणे तक्षक नावाच्या सापामुळे परिक्षीत राजाचा मृत्यू झाला.

ही परिक्षीत राजाची कथा श्रवण केल्यानंतर काहींच्या मनात शंका निर्माण होऊ शकते की, परिक्षीत राजा पुण्यश्लोक अशा पांडवांच्या वंशातील होता. जे पांडव भगवंताचे भक्त होते, साधूसंतांची सेवा करणारे होते. एवढेच नव्हे तर स्वतः भगवंताने परिक्षीत राजाचे ब्रह्मास्त्रापासून रक्षण केले होते. हे सर्व असतांना, परिक्षीत राजाने एका ध्यानस्थ बसलेल्या निरपराध ऋषींच्या गळयात मेलेला सर्प टाकण्याचा अपराध का केला?

या प्रश्नाचे उत्तर असे सांगतात की, जरासंध हा अत्यंत अन्यायी, दुराचारी, अधर्मी होता. म्हणून भगवान श्रीकृष्ण भीम, अर्जूनासोबत गेले. भिमाने जरासंधाचा वध केला. त्याच्या वधानंतर त्याचा अमुल्य हिरे माणिक-मोत्याने जडलेला सोन्याचा मुकूट भीम घेऊन आले व कपाटात ठेवला. पांडवांच्या महानिर्वानानंतर परिक्षीत राजाने ज्या कपाटात तो जरासंधाचा मुकूट ठेवलेला होता ते कपाट उघडले. त्या कपाटातील तो जरासंधाचा मुकूट धारण करताच परिक्षीत राजाला शिकार करण्याची, संताच्या गळयात मेलेला साप घालण्याची दुष्ट बुद्धी जी झाली त्याला कारण म्हणजे, दुष्ट अधर्मी अन्यायी जरासंधाने वापरलेला मुकूट परिक्षीत राजाने वापरल्यामुळे परिक्षीत राजाला जरासंधाप्रमाणे दुष्ट बुद्धी निर्माण झाली. म्हणून दुर्जनाची संगतीच काय परंतु दुर्जनाने वापरलेली वस्तू जरी आपण वापरली तरी दुष्ट बुद्धी झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून आत्ताच ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगाचा चरण सांगितला की, *'' दुर्जनाच्या संगे दुर्जनत्व प्राप्ती । कैसी त्या विश्रांती साधकासी ''* भाविक भक्ताला साधकाला देखील दुर्जनाच्या सहवासाने दुर्जन बुद्धी झाल्याशिवाय राहत नाही.

दुर्जनाच्या संगतीचा कसा दुष्परिणाम होतो हे सांगतांना संत तुकाराम महाराज म्हणतात....

**बसता चोरापासी तैसी होय बुद्धी । देखताची चिंधी मन धावे ।**
**व्याभिचाऱ्यापासी बसता क्षणभरी । देखताची नारी मन धावे ।।**

कितीही श्रीमंत असेल, चिंधी म्हणजे अगदी नगण्य जी मागितल्यानंतर सहज मिळेल अशी वस्तू असेल, तरी परंतु ती वस्तू मागून न घेता चोराच्या संगतीत राहिल्यामुळे चोरी करून घेण्याची भावना मनात निर्माण होते. एखाद्या व्याभिचारी व्यक्तीजवळ चांगला व्यक्ती क्षणभर म्हणजे थोडा वेळ जरी बसला तरी स्त्री बघितल्यानंतर त्याच्या मनात वाईट विचार येतात. वाईट विचार मनात आल्यामुळे तो वाईट मार्गाला लागतो. वाईट मार्गाला तो अगदी लगेच सहज लागतो. परंतु परत चांगला मार्ग धरण्यासाठी मात्र खूप प्रयास करावा लागतो. जशी बिल्ब मंगलब्राम्हण साधकाची कथा महापुरुष सांगतात की,

बिल्बमंगल एक ब्रह्मचारी तरुण साधक होता. एक दिवस गुरुने ज्या रस्त्याने जाण्या-येण्याची मनाई केली होती त्याच रस्त्याने आश्रमात येत असतांना एका शुद्राचे व वेश्येचे अश्लील कृत्य त्याने बघितले. त्यामुळे त्याच्या मनामध्ये वाईट विचारांचा संचार झाला. त्या वाईट विचारामुळे तो चिंतामणी नावाच्या वेश्येच्या घरी जायला लागला.

एक दिवस बिल्बमंगलाच्या वडिलांचे श्राद्ध होते. लोक लज्जेस्तव त्याने कशीतरी श्राद्धाची विधी पूर्ण केली व लोकांनी त्याला पुष्कळ समजावले तरी परंतु तो त्या सर्वांचे काहीही न ऐकता त्या श्राद्धाच्या दिवशीही त्या वेश्येकडे जायला निघाला.

वेश्या त्याच्या गावापासून बऱ्याच दूरच्या दुसऱ्या गावाच्या नदीकिनारी असलेल्या बंगल्यात राहत होती.

ज्या वेळेस बिल्बमंगल त्या वेश्येकडे निघाला त्या वेळेस मुसळधार पाऊस सुरू झाला. ढगांचा कडकडाट, विजेचा लखलखाट जिकडे तिकडे

पाणीच पाणी झाले. तरी परंतु अशाही परिस्थितीत बिल्बमंगल त्या वेश्येकडे निर्भयपणे चालत राहिला. *" कामातूरा भय न लज्जा "* म्हणतात, त्याप्रमाणे तो त्या नदीजवळ आला तेव्हा नदीला पूर आलेला होता. त्याने त्या पुरात उडी टाकली व पैलतिराला पोहचला. तेव्हा जवळपास अर्धारात्र झालेली होती. आज बिल्बमंगलाच्या वडिलांचे श्राद्ध असल्यामुळे बिल्बमंगल येणार नाही, असे समजून चिंतामणी वेश्या वरच्या मजल्यावर निश्चिंत झोपली होती.

बिल्बमंगल ज्या वेळेस त्या बंगल्याजवळ गेला तेव्हा खिडक्या दारे बंद असलेले त्याने बघितले. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी काय करावे याचा विचार करत असतांना त्याला वरची खिडकी उघडी दिसली व त्या खिडकी जवळ एक दोर लोंबकळत असलेला त्याला विजेच्या प्रकाशात दिसला. त्याला धरून तो वर गेला व त्याने त्या वेश्येला जागे केले. ती वेश्या जागी होताच तिला भयही वाटले व मोठे आश्चर्य ही वाटले. कारण अशा भयाण रात्री बिल्बमंगल वरच्या मजल्यावर आला कसा काय? त्याचे कपडे फाटलेले होते व अंगाचा भयंकर दूर्गंध येत होता. तिने त्याला विचारले आपण वर आले कसे काय? तेव्हा बिल्बमंगल म्हणाला की, तू जो खिडकीला दोर बांधून ठेवलेला होता त्या दोराच्या साह्याने मी वर आलो. हे ऐकूण तिला मोठे आश्चर्य वाटले. कारण तिने तर कोणताही दोर बांधलेला नव्हता. आता पाऊस वारा थांबलेला होता. दिवा घेऊन तिने बघितले तेव्हा दिसले की, एक भला मोठा काळा साप खिडकीच्या गजाला तोंडाणे धरून लोंबकळत होता. ज्याला दोर समजून त्या सापाचा दोराप्रमाणे उपयोग करून बिल्बमंगल वर आला होता. त्याने व तिने हे दृश्य बघितल्यानंतर दोघेही भयभीत झाले.

त्यानंतर त्या वेश्येने आपण एवढ्या पुरामधून म्हणजेच नदीला आलेल्या खूप पाण्यामधून इकडे कसे काय आले, असे विचारले तेव्हा



बिल्बमंगलाने सांगितले की, मी पुरात उडी टाकल्यानंतर एक लाकूड मला मिळाले, त्याच्या साह्याने मी नदीपार करून या तिराला आलो. हे ऐकून त्या वेश्येला आश्चर्य वाटले म्हणून ते दोघेही ते लाकूड बघायला गेले तर ते लाकूड नसून एक सडलेले स्त्रीचे प्रेत होते. ज्या प्रेताच्या दूर्गंधाने बिल्बमंगलाचे अंग देखील दूर्गंधीत झाले होते. ते बघितल्यानंतर तर अजूनच भय निर्माण झाले.

हे दोन्ही प्रसंग व बिल्बमंगलाची ही सर्व अवस्था बघून तुमचे माझ्यावर किती प्रेम आहे, असे ती वेश्या न म्हणता ती वेश्या बिल्बमंगलाला म्हणाली, " हे बिल्बमंगल ! धिक्कार आहे तुझ्या जीवनाला. ज्या माझ्या हाड, मास, मल, मुत्राने भरलेल्या शरीरावर तू एवढा असक्त झालेला आहे, त्या शरीराची एक दिवस हिच गती होणार आहे, जी तुझ्या समोर सडलेल्या प्रेताची झालेली आहे. या नश्वर शरीरावर तू जेवढा असक्त झाला, माझ्यावर जेवढे तू प्रेम केले, ऐवढेच प्रेम तू जर भगवंतावर केले असते तर तुझा उद्धार झाला असता. "

हे शब्द बिल्बमंगलाच्या कानी पडताच त्याच्या काही पूर्व जन्माच्या पुण्यामुळे त्याचा विवेक जागृत झाला. मनात वैराग्य संचारले व त्याच क्षणी त्याने त्या चिंतामणी वेश्येला गुरू मानून तिला प्रणाम करून भगवंताच्या प्राप्तीसाठी अरण्याचा रस्ता धरला.

त्यानंतर एकांतामध्ये तो साधना करायला लागला. खूप भूख लागल्यानंतर मधोकरी मागण्यासाठी तो गावात यायचा. एक दिवस असाच मधोकरी मागून तो परत जात असतांना एक सुंदर स्त्री त्याला दिसली. त्या सुंदर स्त्रीचा चेहरा परत बघण्याची त्याला इच्छा झाली. त्यामुळे तो मागे फिरला व त्या स्त्रीच्यामागे चालायला लागला.

ती स्त्री एका घरात शिरली तेव्हा बिल्बमंगल तिच्या दरवाज्या समोर ओट्यावर तिची येण्याची वाट बघत बसला. थोड्या वेळाने त्या

स्त्रिचा पती बाहेर आला तेव्हा एक ब्रह्मचारी ओट्यावर बसलेला त्याने बघितला. आपण असे बसण्याचे कारण काय? असे विचारल्यानंतर जे खरे होते ते बिल्वमंगलाने सांगितले की, आता जी स्त्री घरात गेली तिचा सुंदर चेहरा बघण्याची मला इच्छा आहे. तो सद्गृहस्थ असल्यामुळे त्याने क्षणभर विचार केला की, माझ्या स्त्रिचा सुंदर चेहरा बघून याच्या मनाची तृप्ती होणार असेल तर काय हरकत आहे. बिल्वमंगलाला तेथेच बसून राहण्याचे सांगून तो सद्गृहस्थ घरात गेला.

त्याच क्षणी बिल्वमंगलाच्या मनात विचारचक्र सुरू झाले की, वेश्येचा मोह त्यागला आणि या स्त्रीचा सुंदर चेहरा बघण्यासाठी केविलवाणा चेहरा करूण येथे दयनिय अवस्थेमध्ये बसलो याचे कारण काय? तर हे डोळे. या डोळयामुळेच माझे अधःपतन होत आहे. तेव्हा काहीतरी उपाय केलाच पाहिजे. असा विचार तो करत होता. त्याच क्षणी त्या स्त्रिला घेऊन ते सद्गृहस्थ तेथे आले. त्या स्त्रिच्या सुंदर चेहऱ्याकडे एक क्षणभर बिल्वमंगलाने बघितले व दुसऱ्याच क्षणी ज्या डोळयामुळे हे सर्व झाले त्या डोळयाला दंड द्यावा म्हणून तेथे पडलेले दोन काटे दोन्ही हातात घेतले व दोन्ही डोळयात खूपसले. दोन्ही डोळयातून रक्ताच्या धारा वाहायला लागल्या व त्याच क्षणी *''हरेकृष्ण हरेकृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे''* चा जयघोष करत बिल्वमंगल तेथूण चालायला लागला.

बिल्वमंगल भगवंताचे स्मरण चिंतन करत वनात निघाला. एका खड्यात पडायला आला तर एका मुलाने त्याला वाचवले. बिल्वमंगलाने त्या मुलाचे नाव विचारले तेव्हा तो मुलगा म्हणाला माझे तर अनेक नाव आहे, ज्या नावाने जो बोलावतो मी येतो. राहतो कुठे तर तो मुलगा म्हणाला येथेच जवळच राहतो. शेवटी तो मुलगा म्हणाला आपण येथेच रहा मी आपली येऊन सेवा करत राहीन.

अशा प्रकारे भगवंत त्या मुलाच्या रूपाने बिल्वमंगलाची सेवा



करायला लागले. एक दिवस थोडासा येण्यासाठी उशिर झाला. तर बिल्वमंगल विचार करायला लागला. तो मुलगा अजून आला नाही किती गोड आवाज आहे त्याचा आणि दुसऱ्याच क्षणी बिल्वमंगलाच्या मनात विचार आला की, त्या वेश्येच्या मोहजाळामधून सुटलो तर या मुलाच्या गोड आवाजाची आठवण व्हायला लागली. हे तर ठीक वाटत नाही. असा विचार मनात येता क्षणीच तो मुलगा आला व म्हणाला सुरदासजी काय विचार करता? वृंदावनला चालायचे? वृंदावनाचे नाव ऐकताच मनात आनंद निर्माण झाला. बिल्वमंगलाची काठी त्या मुलाच्या रूपात असलेल्या भगवंताने धरली. थोड्या वेळात तो मुलगा म्हणाला हे आले वृंदावन! हे ऐकताच बिल्वमंगलाची निश्चित खात्री झाली की, हे साक्षात भगवंत आहे. बिल्वमंगलाने भगवंताचा हात धरला तर भगवंताने आपला हात बिल्वमंगलाच्या हातातून सोडवून घेतला. त्याचक्षणी बिल्वमंगलाच्या मुखातून शब्द निघाले.

**हात छूडाके जात हो, निर्बल जाणीके मोहे ।**
**हृदय से जब जावोंगे, सबल मानू मै तोहे ।।**

हे प्रभू मला निर्बल माणून हात सोडवून आपण जात आहात ठीक आहे, परंतु आपण जर खरोखरच बलवान असाल तर माझ्या हृदयातून जाऊन दाखवा. अशा प्रकारे भगवंताने त्यांना दर्शन दिले, ते कृतार्थ झाले.

ही बिल्वमंगलाची कथा एवढ्या विस्ताराने सांगण्याचे कारण हेच आहे की, दुर्जनाच्या क्षणाच्या संगतीने जीव लगेच दुर्जन होतो. परंतु परत सज्जन भक्त संत होण्यासाठी खूप मोठा प्रयास करावा लागतो. म्हणून दुर्जनाच्या संगतीत जाऊ नये. कारण दुर्जनाच्या संगतीत गेल्यानंतर त्याची अवस्था चुचूंद्रिला धरलेल्या सापा सारखी होते. चुचूंद्रिला धरलेल्या सापाची कशी अवस्था होते तर सांगतात..

**प्रिती करी सुख लेण को सो सुख गया हिराय ।**
**जैसी पाई छछुन्दरी पकडी साप पछिताय ।।**

उंदीर समजून खाण्यासाठी सुख मिळविण्यासाठी साप चुचूद्रि धरतो परंतु धरल्यानंतर मात्र त्याला अत्यंत पश्चाताप होतो कारण

**जो छोडे तो आंधरा खाये तो मरीजाय ।**
**ऐसे संग छछून्दरी दोनो भाँती पछिताय ।।**

सापाने चुचूद्रि धरल्यानंतर त्याला जो पश्चाताप होतो त्याचे कारण म्हणजे ती चुचूद्रि खाल्यानंतर सापाचा मृत्यू होतो. मृत्यू होऊ नये म्हणून त्या चुचूद्रिला सोडून दिले तर साप आंधळा होतो. अशा प्रकारे खावे तर मरणाचे भय सोडून द्यावे तर आंधळा होण्याचे भय त्यामुळे खाताही येत नाही व सोडताही येत नाही. अशी अवस्था होते, काय करावे हेच त्याला समजत नाही.

त्याच प्रमाणे जे खुनी, दरोडेखोर, व्यसनी आदिंची संगती धरतात त्यांची देखील चुचूद्रिला धरलेल्या सापाप्रमाणे दयनिय अवस्था होते. खुनी दरोडेखोराच्या टोळीतून बाहेर पडावे तर पुढील जीवन अंधकारमय वाटते. त्यांच्याच संगतीत रहावे तर प्रत्येक क्षणी मृत्यूचे भय समोर असते. अशा प्रकारे दुर्जनांच्या संगतीत राहणाऱ्यांचे जीवन नरकासमान दुःखमय होते. म्हणून ज्ञानी सांगतात, दुर्जनाच्या संगतीत क्षणभर देखील जाऊ नका. कारण...

**वोढाळेच्या संगती पाहे । क्षणभरी गेलीया धर्मगाये ।**
**त्या क्षणासाठी पाहे । लोढणे वाहे निरंतर ।।**

दुर्जनाच्या संगतीत क्षणभर म्हणजेच थोडा वेळ, एखाद्या वेळेस जरी गेले तरी नेहमी दुःख ही दुःख भोगावे लागते, जसे उदाहरण दिले की, वोढाळ गाय म्हणजेच जी खुंट्यापासून सोडली तिच्याकडे थोडे दुर्लक्ष झाले की, ती लगेच दुसऱ्याच्या मालात जाते. दुसऱ्याचे पीक खाते. अशा ओढाळ गायीच्या संगतीत धर्मगाय म्हणजेच चांगली गाय गेली की, ती देखील ओढाळ बनते त्यामुळे ओढाळ गायीच्या संगतीमुळे धर्मगायीला



म्हणजेच चांगल्या गायीला निरंतर म्हणजे नेहमी गळयात ओढण वागविण्याची पाळी येते. त्यामुळे नेहमी ती गाय ओढण्याचा मार खात राहते. अशी पाळी आपणावर येऊ नये असे वाटत असेल तर त्यासाठी महापुरुष सांगतात की,

**या लागी दुर्जनाची संगती । क्षणार्थी पाडी अनर्थी ।**
**मुमूक्षू ऐशिया प्रती । अनुमात्र वस्ती न जावे ।।**

दुर्जनाच्या संगतीत गेल्यानंतर क्षणार्धात अनर्थ होतो. म्हणून मुमूक्षूने म्हणजेच ज्यांना मुक्त व्हायचे असेल त्यांनी क्षणभर देखील दुर्जनाच्या संगतीत जाऊ नये. दुर्जनाच्या संगतीच्या परिणामाविषयी संत तुकाराम महाराज देखील म्हणतात.

**ओढाळाच्या संगे सात्वीक नासली । क्षण एक नाडली समागमे**

ओढाळबाईच्या संगतीत क्षणभर देखील चांगली स्त्री गेली तर ती देखील ओढाळ बनते. म्हणून ओढाळाच्या संगतीत जाऊ नये.

दुर्जनाच्या संगतीचा परिणाम केवळ स्त्री-पुरुषावर, मुला-मुलीवर, पशू-पक्ष्यावर, सजीवावर होतो, असे नाही तर जड पदार्थावरदेखील संगतीचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. यासाठी मूळ अभंगामध्ये संत बहेणाबाई म्हणतात..

**दुर्जनाच्या संगे दुर्जनची होय । पाहे अभिप्राय सहज तो ।।**
**हिंगाची संगती लागली कापुरा । स्वगूण तो खरा हारपला ।।**
**ताकाचे संगती नासले ते दूध । भांग करी मुग्ध जीव क्षणे ।।**

दुर्जनाच्या संगतीने किंवा ज्याला जसी संगती मिळते त्या संगतीप्रमाणे तो व्यक्ती किंवा वस्तू होत असते. याचा अभिप्राय म्हणजेच उदाहरण हिंगाची आणि कापुराची संगती झाली तर हिंगाला कापुराचा गंध येतो. ताकाच्या संगतीने दूध नासून जाते. याचा अनुभव आपण घेतला नसेल परंतु बऱ्याच व्यक्तींनी अनुभव घेतला असेल की, तो म्हणजे '' भांग करी

मुग्ध जीव क्षणे.'' भांग किंवा भांगेसारखे नशेचे पदार्थ नशा करणाऱ्या व्यक्तीला क्षणार्धात मुग्ध करतात. म्हणजेच त्याची सद्सद्विवेक बुद्धी नाश करतात. चांगले-वाईट, हित-अहित, पाप-पूण्य, धर्म-अधर्म हे व्यसणी व्यक्तीला कळत नाही.

जशी एका व्यसनी व्यक्तीने भांग खाल्ली. त्याला नशा चढल्यानंतर तो आपल्या शेताकडे निघाला. त्याचे शेत होते गावाच्या पूर्वेला. परंतु तो मात्र निघाला पश्चिमेला. पाऊल रस्त्याने जात असतांना त्याला एकाने विचारले कुठे निघाले, तर तो म्हणाला माझ्या शेताकडे निघालो. पुढे रस्त्याने जात असतांना एक भलामोठा म्हशीच्या शेणाचा पोह पडलेला होता. त्याला बघून तो उभा राहिला व त्या शेणाकडे बघून म्हणायला लागला माझ्या रस्त्यामध्ये हे घमेलं कुणी ठेवल? उचला लवकर याला. असे तो वारंवार म्हणत होता. तेवढ्यात दुसऱ्या बाजूने काही शाळेतील मुले आले, त्या मुलांनी व्यसनी व्यक्तीला सांगितले अहो बाबा! हे घमेलं नाही शेण आहे, शेण! तरी परंतु तो म्हणत राहिला कोण म्हणतो शेण आहे. हे शेण नाही, घमेलंच आहे. हे शेण आहे, असे वारंवार सांगूनही न ऐकल्यामुळे मुले निघून गेली तरी त्याची बडबड सुरूच होती. हे शेण नाही, घमेलंच आहे, शेवटी तो स्वतःशिच बडबडायला लागला. घमेलं आहे, मुले म्हणतात शेण आहे. हे शेण आहे की घमेलं आहे. घमेलं आहे की शेण आहे. असे बडबडत तो अगदी जवळ गेला. चांगले निरखून बघितले तरी त्याला कळेना. काय आहे शेवटी त्याने आपले बोट शेणात खुपसले. थोडे शेण बोटावर घेऊन त्याची बडबड सुरूच होती. शेण आहे की घमेलं आहे? घमेलं आहे की शेण आहे. असे म्हणत शेवटी त्याने ते शेण आपल्या तोंडात घातले. तेव्हा त्या शेणाची थोडीशी चव त्याला लागली. त्यावेळेस तो म्हणाला, हां शेणच आहे. तोंड शेणाने भरलेला तो व्यसनी म्हणाला, बर झाल बाबा! माझा पाय नाही भरला. तोंड शेणाने भरल हे तो विसरूनच गेला. *'' भांग करी मुग्ध जीव क्षणे ''* व्यक्तीचाच काय परंतु



वस्तुवर देखील परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. संत तुकाराम महाराज देखील म्हणतात...

**विषाने पक्वाने गोड कडू झाली । कुसंगाने केली तैसी परी ।।**
**भावे तुका म्हणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्याशिंचा ।।**

कितीही गोड पदार्थ असेल तर तो पदार्थ कडू होतो म्हणजेच विषमय होतो. तो अन्नपदार्थ जो सेवन करतो त्याचा मृत्यू होतो. मृत्यू होण्यासाठी अन्न विषमय होण्यासाठी खूप विष पाहिजेच असे नाही.

**बहुत अन्न विष मोहरिच्या माने । अवघेचि तेणे विष होय ।।**

अन्न खूप असेल, परंतु त्यामध्ये थोडे जरी विष पडले तर ते सर्व अन्न विषमय होते. असे विषमय अन्न सेवनाने मृत्यू होतो. त्याच प्रमाणे थोडी जरी दुर्जनाची संगती घडली तरी त्या कुसंगाने म्हणजेच वाईट संगतीमुळे दुर्गती होते. जसे तुकाराम महाराज म्हणतात...

***''भावे तुका म्हणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्यांशीचा ।।***

साधू संतांची, चांगल्यांची म्हणजेच ज्याचा आचार विचार चांगला असेल अशा सत्पुरुषाच्या संगतीने मोक्ष मिळतो तर दुर्जनाच्या संगतीमुळे अधोगती म्हणजेच चौऱ्यांशीच्या गतीला नरकाला जीव जातो, असे केवळ संतच म्हणतात असे नव्हे तर भगवान राम देखील म्हणतात...

**संत संग अपबर्ग, कामी भव कर पंथ ।**
**कहही संत कोबिद, श्रुती पुराण सद्ग्रंथ ।।**

संत, कवी, ज्ञानी, श्रुती, पुराण आणि सद्ग्रंथ असे सांगतात की, संताचा संग अपबर्ग म्हणजेच मोक्ष देणारा आहे तर कामी कामनायुक्त दुर्जनांचा संग जन्ममृत्यूच्या चक्रात भ्रमण करायला लावणारा आहे.

आतापर्यंत जेवढे संतांचे भगवंताचे विचार जाणले त्या सर्व विचारांचा सारांश हाच सांगता येईल की, संतांच्या सज्जनांच्या संगतीने या जगात सुख, समाधान, शांतता मिळते व मृत्यूनंतर सद्गती म्हणजेच मोक्ष मिळतो.

दुर्जनाच्या संगतीने जिवंतपणी दुःख व मृत्यूनंतर चौऱ्यांशिची, नर्कवासाची गती प्राप्त होते.

म्हणून या जगात सुख-समाधान व मृत्यूनंतर सद्‌गती म्हणजेच मोक्ष प्राप्त करायचा असेल, जिवंतपणी दुःख भोगून नरकात जायचे नसेल तर संतांची सज्जनांची संगती धरली पाहिजे. विशेष म्हणजे चुकून देखील दुर्जनांची संगती धरू नये. दुर्जनांच्या संगतीत आपण जाऊ नये असे वाटत असेल तर त्यासाठी हे जाणले पाहिजे की, दुर्जन कुणाला म्हणतात? म़्हणजेच दुर्जनाचे लक्षणे काय आहे, हे प्रथम जाणले पाहिजे. भगवान श्रीराम भरताला निमित्त करून सर्वांना दुर्जनाचे लक्षणे सांगतांना म्हणतात.

## दुर्जनाची लक्षणे

**खलन्ह हृदय अति ताप बिसेषी । जरही सदा पर संपत्ती देखी ।**
**जहँ कहूँ निंदा सुनही पराई । हरषही मनहूँ परी निधी पाई ।।**

खलाच्या म्हणजेच दुष्ट दुर्जनाच्या हृदयामध्ये नेहमी संताप भरलेला असतो. दुसऱ्याची सुख संपदा बघून ते नेहमी जळत राहतात. म्हणजेच कुणी सुखी समाधानी असेल तर ते त्यांच्याकडून बघवल्या जात नाही. दुसरे दुःखी कसे होतील याच्या प्रयत्नात तो राहतो. त्याला जर का कुणाची निंदा ऐकायला मिळाली तर तो असा आनंदित होतो की, जणू त्याला रस्त्यात पडलेला खूप मोठा खजाणा मिळाला. अजून दुष्टाचे लक्षणे सांगतात...

**काम क्रोध मद लोभ परायण । निर्दय कपटी कुटिल मलायण ।**
**बयरू अकारन सब काहू सो । जो कर हित अनहित ताहू सो ।।**

दुर्जनाच्या मनात नेहमी काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर भरलेला असतो. दुर्जन निर्दयी, कपटी, कुटील कारस्थान करण्यात नेहमी निमग्न असतो. तो केवळ पापाची खाणच असतो. तो नेहमी अकारण म्हणजेच काहीही कारण नसतांना सर्वांसोबत वैर करत राहतो. अशा दुर्जनाचे जो



हित करतो त्या हित करणाऱ्याचे देखील दुर्जन अहितच करत राहतो. एवढेच नव्हे तर...

**माता पिता गुरु विप्र न मानही । आपू गये अरू घालही आनही ।**
**करही मोह बस द्रोह परावा । संत संग हरि कथा न भावा ।।**

दुर्जनाला ज्या आई-वडिलांनी लहानचे मोठे केले त्या आई-वडिलांना ज्ञान देणाऱ्या गुरुजनांना, ब्राम्हणांना तो दुर्जन मानत नाही. आपण तर मानत नाही परंतु जे मानतात त्यांना देखील न मानण्याचा सल्ला दुर्जन देत राहतो. मोहवश तो नेहमी दुसऱ्याचा द्वेश करत राहतो. सुधारण्याचा जो उपाय आहे, तेथे तो जात नाही. म्हणजेच साधू-संतांच्या सज्जनांच्या संगतीत तो जात नाही. सर्व व्यथा नाश करणारी भगवंताची कथा त्याला आवडत नाही, दुर्जनाची अजून लक्षणे सांगतात...

**अवगुण सिंधू मंदमती कामी । बेद बिदुषक परधन स्वामी ।**
**विप्र द्रोह पर द्रोह बिसेषा । दंभ कपट जीयेधरे बिसेषा ।।**

दुर्जन दुराचारी अवगुणांचा जणू समुद्र, मंदबुद्धी, काम, क्रोधाने व्याप्त, वेदांची निंदा करणारा, नेहमी परक्याच्या धनाची अभिलाषा ठेवणारा असतो. त्याच प्रमाणे असा दुर्जन विशेष करून ब्राह्मणांचा जास्त द्वेश करतो. असा दुर्जन दुराचारी वेष बघून ओळखणे कठीण असते. कारण अंतःकरणाने तो कितीही मलीन असला तरी कपट झाकण्यासाठी सुंदर किंवा चांगला वेष तो परिधान करतो.

जसे भगवंताने दुर्जनाची लक्षणे सांगितले त्याच प्रमाणे ज्ञानी महापुरुष साधूसंत देखील दुर्जनाची लक्षणे सांगतात. ते म्हणतात...

**मन्दमती दुर्जनो को ना सत्संग सुहाय ।**
**माक्खी तजै सुगन्धि को ता मन विष्ठा भाय ।।**

जे मंदबुद्धी दुर्जन असतात त्यांना गोड अशा प्रकारची कथा, कीर्तन, सत्संग, प्रवचन, संत संगती आवडत नाही. हे सर्व सोडून ते ज्या

ठिकाणी निंदा द्वेश मत्सर होत असेल त्या ठिकाणी जाऊन बसतात. जसे घाणीवर बसणाऱ्या माशीला घाण विष्ठा आवडते, त्याच प्रमाणे दुर्जनांना घाण म्हणजेच वाईट व्यक्ती, वाईट आचार-विचार व कुसंगतीच आवडते. म्हणजेच अशुद्ध आहार सेवन करणाऱ्या व्यसनिंना दुर्जन दुराचाऱ्यांची संगतीच आवडते. जसे तुकाराम महाराज देखील दुर्जनांच्या संबंधात म्हणतात...

**सुकरासी विष्ठा माने सावकाश । मिष्ठान्नाची त्यास काय गोडी ।।**
**तेवि अभक्तासी आवडे पाखंड । न लागे त्या गोड परमार्थ ।।**
**श्वानासी भोजन दिले पंचामृत । तरी त्याचे चित्त हाडावरी ।।**
**तुका म्हणे सर्पा पाजिलीया क्षीर । वमिता विखार विष झाले ।।**

दुर्जनांचा स्वभाव श्वान, सुकर किंवा सापाप्रमाणे असतो. जसे सुकराला म्हणजेच डुकराला कितीही पाची-पक्वानाचे गोड पदार्थ दिले तरी त्याला ते पदार्थ आवडत नाही. त्याला घाण विष्टाच आवडते. त्याच प्रमाणे दुर्जन, दुराचारी, व्यसनीला कितीही चांगले पदार्थ खाण्यापिण्यासाठी दिले तरी त्याला ते आवडत नाही. त्याला घाण अशुद्ध मांसाहार आदि व मद्य आदि व्यसनाचे पदार्थच आवडतात. दुर्जनाला साधूसंत आवडत नाही. परमार्थ ही आवडत नाही, त्याला निंदा, द्वेश, मत्सर, पाखंड करणेच आवडते.

दुसरे उदाहरण श्वानाचे म्हणजेच कुत्र्याचे दिले की, कुत्र्याला पाची पक्वांनाचे जरी जेवण दिले तरीही त्याचे चित्त नेहमी हाडाकडेच राहते. हाडूक चघळल्याशिवाय त्याला चैनच पडत नाही. जसे काहींना कितीही चांगले पाची पक्वांनाचे जेवण दिले तरी तंबाखू आदि चघळल्याशिवाय त्याला चैन पडत नाही. एवढेच नव्हे तर काहींना तर प्रत्यक्ष हाडूकच आवडते. पाची पक्वांन्ने चांगले लागत नाही.

दुर्जनाचे अजून एक लक्षण सापाचे उदाहरण देऊन सांगितले की,



सापाला कितीही दूध पाजले तरी तो चावल्याशिवाय राहत नाही. त्या दुधाचे विष झाल्याशिवाय राहत नाही. त्याच प्रमाणे दुर्जनाला कितीही मदत करा तरी तो एक दिवस उपकार करणाऱ्यावर अपकार केल्याशिवाय राहत नाही.

ज्या प्रमाणे तुकाराम महाराजांनी डुकराचे उदाहरण देऊन दुर्जनाचा स्वभाव सांगितला त्याच प्रमाणे नामदेव महाराज देखील म्हणतात...

**सुकराच्या परि नेणती मिष्ठान्न । विष्ठा ते भक्षण करिताती ।**
**नामा म्हणे तया न होयेची मोक्ष । येवोनी पद्माक्ष केवि भेटे ।।**

जे दुर्जन असतात त्यांना सुकरा प्रमाणे मिष्ठान्न आवडत नाही.त्यांना घाणच आवडते, ते अशुद्ध आहार सेवन करतात त्यामुळे ते हिंसा करतात किंवा त्यांच्या निमित्ताने इतर हिंसा आदि करतात. त्यामुळे त्यांची मुक्ती होत नाही. त्यांना भगवंताची प्राप्तीही होत नाही. दुर्जनाची अजून लक्षणे सांगतांना संत म्हणतात...

**मन्दमती दुर्गूणो को त्यागत कष्ट मनाय ।**
**विष्ठा का जन्तु जथा पृथक होय मर जाय ।।**

जे मंदमती दुर्जन असतात ते दुर्गुण, दुष्कर्म, व्यसणे सोडत नाही. जर कुणी त्यांना त्यापासून सोडविण्याचा प्रयास केलाच तर त्यांना खूप त्रास वाटतो. एवढेच नव्हे तर जशी विष्ठेतील किड्याला विष्ठाच आवडते. त्या विष्ठेपासून किड्याला बाजूला केले तर जसा तो मरतो. त्याच प्रमाणे दुर्जन जे असतात ते दुर्गून, दुष्कर्म, व्यसणे सोडून जीवन जगत नाही.

दुर्जनाला कितीही सदूपदेश केला तरी त्याच्यावर चांगल्या उपदेशाचा काहिही परिणाम होत नाही उलट

**दुष्ट न त्यागे दुर्मती, करे लाख उपदेश ।**
**ज्यो ज्यो तेही समझाईए, उसके बढे क्लेश ।।**

दुर्जनाला कितीही उपदेश केला तरी त्या उपदेशाचा दुर्जनांवर

काहिही चांगला परिणाम होत नाही. उलट जसा जस त्याला सद्उपदेश केला जातो तस तसा तो अजून दुःखी होतो. जसे दुर्योधनाला संतानेच काय परंतु साक्षात भगवान श्रीकृष्णाने उपदेश केला. परंतु त्याच्यावर त्या उपदेशाचा काहिही चांगला परिणाम झाला नाही. उलट तो उपदेश ऐकूण त्याला दुःखच झाले, कारण दुर्जन आपला दुष्ट स्वभाव सोडत नाही. जसे नामदेव महाराज देखील उदाहरण देतात...

**कोळशासी दूध मर्दोनिया धूता । न पावेची शुद्धता कोणे काळी ।**
**तैसा दुर्जनाशी बोधिता परमार्थ । न जायेची स्वार्थ जाण त्याचा ।।**

काळया कोळशाला पांढऱ्या शुभ्र दूधाने कितीही धुतले तरी काळा कोळसा कधी दूधासारखा शुभ्र होत नाही. त्याच प्रमाणे दुर्जनाला कितीही परमार्थाचा उपदेश केला तरी त्याचा स्वार्थ जात नाही. जसा दुर्योधनाचा स्वार्थी स्वभाव शेवटपर्यंत गेला नाही. म्हणून दुर्जनाला समजावण्याचा सर्व प्रयत्न निष्फळ होतो, एवढेच नव्हे तर...

**दुष्टन को समझाइए, कर संतन का मेल ।**
**उसके संकट यो बढे, ज्यो अग्नी संग तेल ।।**

सज्जनांनी दुर्जनांना समजावल्यानंतर त्या समजावण्याचा परिणाम त्या दुर्जनावर असा होतो की, जसे अग्नीमध्ये तेल पडावे त्याप्रमाणे दुर्जनाची दुर्जनता कमी तर होत नाही ती दुर्जनता अजून वाढते.

जसे हिवाळयाचे दिवस होते. खूप थंडी पडलेली होती, सकाळ झाल्यानंतर आपल्या खोप्यातून सुगरण पक्षी म्हणजेच चिमणी बाहेर आली. तेव्हा तिने बघितले की, झाडावर बसलेले माकड थंडीने अगदी मरायला आलेले आहे. तिला त्या माकडाची दया आल्यामुळे ती त्या माकडाला म्हणाली की, *" माकडभाऊ दिवसभर इकडे तिकडे उड्या मारण्यापेक्षा एखादे घर बनविले असते तर थंडीपासून बचाव झाला असता."* हा चिमणीचा उपदेश ऐकून त्या माकडाने घर तर बनविले नाही उलट थोडे उन



पडल्यानंतर त्याची थंडी कमी झाल्यानंतर त्याने उडी मारली व त्या चिमणीचा जो खोपा म्हणजेच घरटं होतं ते तोडले व जमिनीवर पिलासह फेकून दिले व रागाने ते माकड म्हणाले, मला उपदेश करत होती का? अशा प्रकारे दुर्जन हे त्या माकडाप्रमाणे असतात, त्यांच्यावर सद्उपदेशाचा चांगला परिणाम होत नाही. जे त्याचे हित करण्याचा प्रयत्न करतात ते त्यांना आपले शत्रू वाटतात. या उलट

**मन्दमती दुर्जनो कि यही सदा से रिती ।**
**जो चाहे उनका बुरा उनसंग करे प्रिती ।।**

दुर्जनांची नेहमीची अशी रीत आहे की, जे दुर्जनांचे हित करतात ते दुर्जनांना आपले शत्रू वाटतात. परंतु जे दुर्जनांचे अहित करतात ते मात्र दुर्जनांना आपले मित्र वाटतात. जसे जे दुर्जनांना वाईट आचार विचार शिकवितात, अन्याय अनितीचा सल्ला देतात एखादे व्यसन करणे शिकवितात ते दुर्जनांना आपले मित्र वाटतात. अशांसोबत दुर्जन मित्रता करतात, म्हणजेच दुर्जनांना सज्जन आवडत नाही. दुर्जनांना दुर्जनच आवडतात. सज्जनांनी कितीही दुर्जनांना सुधारण्याचा प्रयास केला तरी त्यांचा मूळ दुर्जन स्वभाव जात नाही, जसे तुकाराम महाराज म्हणतात...

**निंबाचीया झाडा साखरेचे आळे । आपूली ती फळे सोडीचना ।**
**तैसे अधमाचे अमंगळ चित्त । वमण ते हित करूण सांडी ।।**

लिंबाच्या झाडाला गोड साखरेचे आळे केले व साखरेचाच पाक टाकला तरीही कडूलिंबाला गोड फळे न येता कडूच फळे येतात. त्याच प्रमाणे अधमाला कितीही चांगला उपदेश केला तरी त्याचे चित्त अमंगळ म्हणजेच अशुद्ध असल्यामुळे सद्उपदेशाचा काहीही लाभ होत नाही. हिताच्या गोष्टीचे दुर्जन वमण करतात म्हणजेच हितोपदेश त्यांना पचत नाही. अजून दुर्जनांच्या संदर्भात तुकाराम महाराज उदाहरण देतात की,

**परिसाचे अंगी लाविले खापर । पालट अंतर नेघे त्याचे ।।**

**तुका म्हणे वेळू चंदना संगती । काय ते नसती जवळीके ।।**

परिस लोखंडाला लावल्यानंतर लोखंडाचे सोने होते.असे म्हणतात. परंतु तोच परिस जर खापराला लावले तर त्या खापरामध्ये काहीही परिवर्तन होत नाही. त्याच प्रमाणे सत्संगाने अनेकांचे जीवन बदलून जाते. अनेक पुण्यात्मा म्हणतात की, संतांच्या संगतीमुळे आमच्या जीवनाचे सोने झाले, परंतु सज्जनांची, साधू संतांची, सत्पुरूषाची संगती मिळूनही दुर्जनावर त्या संगतीचा काहीही फरक पडत नाही. जसा परिसाचा खापरावर काहीही परिणाम होत नाही.

त्याचप्रमाणे दुसरे चंदनाचे उदाहरण दिले की, चंदनाच्या संगतीत जी झाडे असतात त्यांना देखील चंदनाचा सुगंध लागतो. परंतु कितीही चंदनाच्या झाडाजवळ वेळू असला तर त्या वेळूला मात्र चंदनाचा सुगंध लागत नाही. चंदनाच्या झाडाजवळ वेळू किंवा बांबू असूनही त्याला चंदनाचा सुगंध का लागत नाही? तर याचे कारण असे सांगतात की, वेळूला गाठी असतात. त्यामुळे चंदनाच्या झाडाचा सुगंध वेळूला लागत नाही. त्याच प्रमाणे जे आतल्या गाठीचे म्हणजेच कपटी बाहेरून दाखविण्याचे असते वेगळे व आतून असते, मात्र दुसरे असे जे आतल्या गाठीचे दुर्जन असतात, त्यांना सज्जनांचा, साधूसंताचा काहीही लाभ होत नाही. दुर्जन साधूसंतांपासून सज्जनापासून, काही उपदेश तर घेत नाही, उलट त्यांची निंदा करून पाप घेतात जसे तुकाराम महाराज म्हणतात...

**अखंड संत निंदी । ऐसी दुर्जनाची बुद्धी ।।**

**काय म्हणावे तयासी । तो केवळ पापरासी ।।**

**जो स्मरे रामनाम । तयासी म्हणावे भिकारी ।।**

**तुका म्हणे विंचानांगी । तैसा दुर्जन सर्वांगी ।।**

दुर्जन अखंड साधूसंतांची सज्जनांची निंदा करत राहतो. तो



केवळ पापाचीच रासी असल्यामुळे त्याला चांगले काही दिसतच नाही. किंवा चांगले देखील त्याला वाईटच दिसते. त्यामुळे चांगल्याला देखील तो वाईटच म्हणतो. जसे कुणी भगवंताचे नामस्मरण करत असेल तर त्याला तो भिकारी म्हणतो. तो सर्वांना दुःखच देतो कारण त्याचा स्वभाव विंचवासारखा नव्हे तर विंचवापेक्षाही महाभयंकर दुःखदायक असतो. विंचवापेक्षाही महाभयंकर दुःख दायक असतो असे म्हणण्याचे कारण की, विंचवाच्या केवळ नांगीतच विष असते, परंतु दुर्जनाच्या तर सर्वांगातच विष असते. असे केवळ तुकाराम महाराज म्हणतात असे नव्हे तर महापुरुष देखील म्हणतात...

**तक्षकस्य विषं दंते मक्षिकाया विषं शिरे ।**

**वृश्चिकस्य विषं पुच्छे सर्वांगे दुर्जनो विषम् ।।**

काही जीव-जंतूच्या शरीरात विशिष्ट भागातच विष असते. जसे सापाच्या केवळ दाततच विष असते, माशीच्या डोक्यात विष असते, विंचवाच्या पुच्छात म्हणजेच नांगीत विष असते. परंतु एक दुर्जन असा असतो की, त्याच्या सर्वांगात विष असते. त्यामुळे दुर्जनाच्या बोलण्याणे, पाहण्याने, दुर्जनाच्या वस्तू वापरल्याने एवढेच नव्हे, तर दुर्जन ज्या ठिकाणी बसला असेल त्या ठिकाणी बसल्याने दुःखही दुःख प्राप्त होते. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात...

**दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलीलासे त्याग देशाचा त्या ।।**

दुर्जनाची संगती तर करूच नये परंतु दुर्जन ज्या ठिकाणी ज्या देशात राहत असेल, त्या ठिकाणचा देशाचा त्याग केला पाहिजे. अन्यथा दुर्जनापासून दुःख प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. दुर्जन विंचापेक्षा जास्त दुःखदायी असतो, असे नव्हे तर सापापेक्षाही महाभयंकर दुःखदायी असतो. कारण महापुरुष म्हणतात...

**दुर्जन खोटा साप से तासे इश बचाय ।**
**साप मिले मार्ग तजे दुर्जन तजा न जाय ।।**

दुर्जन सापापेक्षा महाभयानक दुःखदायी असतो, सापाला बघून किंवा ईश्वराच्या कृपेमुळे सापापासून होणाऱ्या दुःखापासून मुक्तता होऊ शकते, परंतु दुर्जनापासून मुक्तता होणे कठीण आहे, साप दिसल्यानंतर व्यक्ती आपला रस्ता बदलून घेतो. परंतु दुर्जनापासून रस्ता बदलला तरी दुर्जन आपल्या रस्त्याने येतो. साप कुणाच्या पाठीमागे लागत नाही, परंतु दुर्जन मात्र कुणाच्याही पाठीमागे लागतो. साप चावल्यानंतर एकदाच मृत्यू होतो. परंतु दुर्जनामुळे तर जीव नेहमीच जन्म मृत्यूच्या चक्रात भ्रमण करावयास लावतो. दुर्जनाच्या सर्वांगात विष असल्यामुळे दुर्जनाला चांगले काही दिसतच नाही.

त्यामुळे दुर्जन ज्या प्रमाणे साधू-संतांची सज्जनांची निंदा करतो त्याच प्रमाणे तो भगवंताची देखील निंदा करतो. जसे तुकाराम महाराज म्हणतात...

**पापी तो नाठवी आपल्या संचिता । ठेवी भगवंता वरी बोल ।।**
**भेईना करीता पापाचे डोंगर । दुर्जन पामर दुराचारी ।।**
**नाठवी तो खळ आपुली करनी । देवासी निंदोनी बोलतसे ।।**

दुर्जन, दुराचारी, पापी व्यक्ती नेहमी डोंगरासारखे मोठ मोठे पापकर्म करत राहतो. पापाचे फळ भोगण्याची ज्या वेळेस त्याच्यावर पाळी येते त्या वेळेस आपण जे पाप केले त्याचेच हे फळ आहे, असे न आठविता देवाची निंदा करतो की, त्या देवाने मला दुःख का दिले त्या देवाला काही समजत नाही इत्यादी अनेक प्रकारे भगवंताच्या संदर्भात निंदायुक्त वाणी तो उच्चारत राहतो. अशी साधूसंतांची, सज्जनांची, पुण्यवांनाची, भगवंताची निंदा करतांना तो काळ, वेळ काही पाहत नाही. जसे तुकाराम महाराजांनी उदाहरण दिले...



**गाढवाचे ताणे । पालटते क्षणक्षणे ।।**
**तैसे अधमाचे गुण । एकविध नाही जाण ।।**
**उपजता बरे दिसे । रुप वाढता ते नासे ।।**
**तुका म्हणे भुंकते वेळे । वेळ अवेळ न कळे ।।**

गाढव जन्माला आल्यानंतर चांगले दिसते. परंतु जस-जस ते वाढत तस-तस त्याचे रुप बदलत जाते. म्हणजेच लाता मारणे, काळ, वेळ काहीही न बघता भुकंत राहन आदिकूलक्षणे गाढवात दिसतात त्याच प्रमाने दुर्जून, दुराचारी लहान असतांना चांगला दिसतो, परंतु जस जसे त्याचे वय वाढते तस तसे त्याचे अवगुण दिसायला लागतात. तो व्यसन आदी करायला लागतो व त्यानंतर तो व्यसनी केव्हा गाढवासारखे भुकांयला लागेल म्हणजेच शिव्या द्यायला, निंदा करायला किंवा व्यसन करून लोळायला लागेल काही सांगता येत नाही.

मानवाचा जन्म मिळून देखील श्वान सुकराप्रमाणे अखाद्य खान, अपेय पिनं, विंचा व सापाप्रमाणे दुःख देण, गाढवासारखे वेळी अवेळी न बघता भूंकणे म्हणजेच साधू संतांची भगवंताची निंदा करणे, असे अधम कर्म का करतात? असा संदेह अनेकांच्या मनात निर्माण झाला असेल त्या संदेहाच निराकरण करण्यासाठी संत बहेणाबाई म्हणतात...

**ज्याचा तो संस्कार घेऊनिया उठे । लोका दुःख वाटे कासयासी ।।**
**दंश करी ऐसे कोण सांगे सर्वा । विंचवाच्या कोपा लोक कष्टी ।।**
**व्याघ्र लांडग्यासी कोण सांगे कानी । राहोनिया अरणी जीव मारा ।।**
**गोचिड ढेकूण हे रक्त भक्षिती । हे तया सांगती लोक काई ।।**
**बहेणी म्हणे पूर्व संस्कार जीवाचा । प्रवर्तवी साचा न सांगता ।।**

जीवाला ज्या वेळेस मानवाचा जन्म मिळतो तर तो कसा मिळतो? संत सांगतात... *'' एक एक योनी कोटी कोटी फेरा । मनुष्य देह वारा मग लागे ''* एक एक योनित कोट्यावधी फेरे फिरल्यानंतर शेवटी जिवाला

मानवाचा जन्म मिळतो. त्यामुळे ज्या योनीमध्ये तो जास्त काळ राहिला असेल किंवा मानव जन्म मिळण्यापूर्वी तो ज्या योनीतून आला असेल, तर तेच संस्कार त्याच्यावर जास्त राहतात. जन्माला आल्यानंतर काही दिवसांनी ते संस्कार जागृत होतात ते संस्कार जागृत करण्यासाठी कुणाला प्रयास करावा लागत नाही ते आपोआप प्रगट होतात. जसे दंश कर असे सापाला सांगावे लागत नाही. डंख मारण्याचे विंचवाला सांगावे लागत नाही. अरण्यातच राहा व प्राण्यांचे जीव घ्या, असे काही वाघ-लाडग्यांना कुणी सांगत नाही. त्याचप्रमाणे गोचीड, ढेकूण यांनाही रक्त पिण्याचे कुणी शिकवित नाही. त्याचप्रमाणे दुर्जनाला अखाद्य खाणे, अपेय पिणे, निंदा, द्वेश मत्सर करणे कुणी शिकवतातच असे नाही. पूर्वीच्या संस्काराप्रमाणे ते मानवाचा देह असूनदेखील अनेक पशूप्रमाणे आचरण करत राहतात. तो त्यांचा कुसंस्कार किंवा स्वभाव पूर्व जन्माप्रमाणे निर्धारीत असतो. त्यामुळे अशा दुर्जनापासून सज्जनांनी सावधान राहिले पाहिजे. कारण जसे संत नामदेव महाराज म्हणतात...

**दुर्जनाची बुद्धी वोखटी दारुण । आपण मरोनी दुजिया मारी ।**
**माशी जाता पोटी मेली तेची क्षणी । प्राण्या वोकवूनी कष्टी करी ।।**

माशी एखाद्याच्या मुखात गेल्यानंतर ती तर मरतेच परंतु ज्याच्या मुखात गेली असेल त्याला वांत्या होऊन तो दुःखी होतो. माशी ज्याच्या मुखात किंवा पोटात गेली असेल त्यालाच दुःख होते. परंतु दुर्जनाची बुद्धी अतिशय निच असल्यामुळे दुर्जन स्वतः मरून अनेकांना मारतो.

जसा एक दुर्जन व्यक्ती संध्याकाळी अरण्याकडे निघाला होता. त्याला बघून दुसऱ्या एका सज्जन व्यक्तीने अरण्याकडे जाणाऱ्या त्या दुर्जन व्यक्तीला विचारले, कारे संध्याकाळ होत आहे, तू आता अरण्याकडे निघाला, आता अंधार पडेल तुला माहीत नाही का? या अरण्यात वाघ राहतो? हे ऐकूण तो दुर्जन व्यक्ती म्हणाला, अरण्यात वाघ राहतो हे



माहीत आहे, म्हणूनच तर अरण्याकडे निघालो. हे ऐकूण त्या सज्जन व्यक्तीने दुर्जन व्यक्तीला अत्यंत आश्चर्याने विचारले की, अरण्यात वाघ राहतो हे तुला माहीत असतांना या अरण्यात कशासाठी निघाला? तेव्हा तो दुर्जन व्यक्ती म्हणाला, मी अरण्यात यासाठी निघालो की, या अरण्यात वाघ राहतो, असे मी ऐकले आहे. तो वाघ जर मला भेटला तर तो वाघ मला खाईल, त्यामुळे त्याला माणसाच्या रक्ताची, मांसाची चटक लागेल त्यामुळे तो अनकांचे नरडे फोडील. त्या वाघाने अनेकांचे नरडे फोडल्यामुळे मज्जा येईल. आता सांगा हा मेल्यानंतर मज्जा पाहायला याचा बाप नरकातून येणार आहे का? परंतु दुर्जन असे असतात की, ते स्वतः मरून इतरांना मारत असतात, जसे दुर्योधन अधर्म अनितीने वागूण अनेकांना युद्धाला प्रवृत्त करूण स्वतः मेला व इतरांनाही मारले. आजही अनेक अततायी, अतिरेकी आत्मघाती बाँबचा वापर करून स्वतःही मरतात व इतरांनाही मारतात. अशा दुर्जनांना...

**झाली सज्जनांची संगती कदापी । जाईना तथापी त्याची क्रिया ।।**

कर्म-धर्म संयोगाने अशा दुर्जनाला जर सज्जनांची संगती घडली तरी त्याची दुष्ट प्रवृत्ती जात नाही. तो दुष्कर्म सोडत नाही. सन्मार्ग धरत नाही. जसे दुर्योधनाला संतांनी, भगवंतांनी उपदेश केला, परंतु त्याने तो माणला नाही. म्हणून अशा दुर्जनांच्या संदर्भात संत नामदेव महाराज म्हणतात...

**नामा म्हणे कुंभपाकाचा तो धनी । तयासी भल्यांनी बोलू नये ।।**

असा आपण मरून इतरांना मारणारा जो दुर्जन असेल तो कुंभपाक नरकाला जातो, अशा दुर्जनासी आपण बोलू नये. संत तुकाराम महाराज देखील म्हणतात...

**दुष्टाचे चित्त न भिने अंतरी । जरी जन्मभरी उपदेशीला ।।**
**पालथे घागरी घातले जीवन । न भरिच जाण तेही त्याला ।।**
**म्हणउनी संग न धरिता भला । धरिता अबोला सर्व हित ।।**

जो दुर्जन असतो त्याला जन्मभर जरी उपदेश केला, तरी त्या उपदेशाचा त्याच्यावर काहीही फरक पडत नाही. उपदेशाने त्याच्यामध्ये काहीही परिवर्तन होत नाही. जसे पालथ्या घागरीवर कितीही पाणी टाकत राहिले तरी त्या पाण्याने जशी पालथी घागर भरत नाही, त्याचप्रमाणे उपदेशाने दुर्जनाला काहीही लाभ होत नाही. तो आपले दुष्कर्म सोडत नाही. म्हणून दुर्जनाची संगती करू नये. दुर्जनासी बोलू देखील नये. नामदेव महाराज देखील उपदेश करतात...

**दुष्ट तो दुर्जन दुरीच धरावा । संग न करावा पापीयाचा ।।**
**सर्पाचे पिले साने म्हणउनी पोशीले । त्यासी पान दिधले अमृताचे ।।**
**नव्हे ते निर्विष न सांडी स्वभावगुण । घेऊ पाहे प्राण पोशील्याचे ।।**

जो दुष्ट दुर्जन पापी असेल त्याची चुकून देखील संगती करू नये. सापाचे लहान जरी पिलू असेल त्याला अमृत पाजून मोठे केले तरी तो साप निर्विष होत नाही. ज्याने त्याला लहानचे मोठे केले त्याचा देखील तो साप प्राण घेतो. जसा सापाचा स्वभाव तसाच दुर्जनाचा देखील स्वभाव असतो, म्हणून दुर्जनाची संगती करू नये. दुर्जनासी बोलू नये. संत एकनाथ महाराज देखील म्हणतात...

**सज्जनाच्या संगे दुर्जन लागत । नाना विटंबित सज्जनांसी ।।**
**दुर्जनाचे अन्न सेवुनी दुर्वास । छळीले पांडवास निशिमाजी ।।**
**एका जनार्दनी दुर्जनाचा संग । तेणे होय भंग भाविकासी ।।**

सज्जनाच्या संगतीत दुर्जन गेल्यानंतर तो दुर्जन सज्जनाला त्रास दिल्याशिवाय राहत नाही. म्हणून दुर्जनापासून दुरच राहिलेले चांगले. दुर्जनाचे अन्न देखील सेवन करू नये. जसे दुर्जनाचे अन्न खाल्ल्यामुळे



दुर्वास ऋषींना दुर्बुद्धी निर्माण झाली त्यामुळे त्यांनी पाडवांचा छळ केला. म्हणून दुर्जनाची संगती चांगली नाही. दुर्जनाच्या संगतीमुळे भाविकालादेखील दुःख प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे संत तुकाराम महाराज देखील उपदेश करतात...

**दुर्जनाची गंधी विष्ठेचियापरी । देखोनिया दुरी व्हावे तया ।।**
**आइका हो तुम्ही मात हे सज्जन । करू संघष्टन नये बोलो ।।**
**दुर्जनाचे भय धरावे त्यापरी । पिसाळलेवरी धावे श्वान ।।**

विष्ठेला पाहून जसे ज्ञानी त्या विष्ठेपासून बाजूला जातात त्याप्रमाणे दुर्जनापासून बाजूला म्हणजेच दूर गेले पाहिजे. विष्ठेचा जसा दुर्गध येतो त्याच प्रमाणे दुर्गूणी, दुराचारी, व्यसनी लोकांच्या तोंडाचा देखील दुर्गंध येतो. तो दुर्गंध तर विष्ठेपासून येणाऱ्या दुर्गंधापेक्षाही महान हानिकारक असतो जसे विड्या, सिगारेट, मद्य पिणाऱ्यांच्या तोंडाचाच नव्हे तर अंगाचा देखील दुर्गध येतो. त्यामुळे मन तर अप्रसन्न होतेच, पण आपले शरीर देखील रोगी होऊ शकते. म्हणून अशांच्या जवळ जाऊ नये. त्यांच्याशी बोलू नये त्यांची संगती करू नये. एवढेच नव्हे तर तुकाराम महाराज म्हणतात, जसे पिसाळलेल्या कुत्र्यापासून सावधान राहिले पाहिजे तसेच दुर्जनापासून सावधान राहिले पाहिजे. जसे पिसाळलेल कुत्रे कुणालाही चावते, तशीच अवस्था दुर्जनाची असते. तो चांगले, वाईट, सज्जन, दुर्जन काहीच जाणत नाही. त्याच प्रमाणे एखाद्या गावात, भागात एक कुत्रे पिसाळले की त्याच्या संसर्गाने अनेक कुत्रे पिसाळतात. त्याचप्रमाणे एखाद्या गावात भागात एखादा दुर्जन, दुराचारी, व्यसनी निर्माण झाला की, त्याच्या संगतीने अनेक त्याच्यासारखेच बनतात. म्हणून काकभुशूण्डीऋषी देखील गरुडाला निमीत्त करून उपदेश करतात...

**सुनू खगपती अस समुझी प्रसंगा । बुध नही करही अधमकर संगा ।**
**कबी कोबिद गावही अस निती । खल सन कलह न भल नही प्रिती ।।**
**उदासीन नित रहिय गोसावी । खल परिहरी स्वान की नाई ।**

हे गरुडजी, जे ज्ञानी असतात ते अधमाची म्हणजेच दुर्जनाची संगती करत नाही. कवी, ज्ञानी अशी निती मर्यादा सांगतात की, दुर्जनासी कलह म्हणजेच वाद-विवाद, भांडण करणे चांगले नाही. त्याचप्रमाणे त्यांच्याशी प्रेम करणेही चांगले नाही. त्याच्याप्रती उदासीन भाव ठेवला पाहिजे. कुत्र्याशी जसा व्यवहार करतो, तसा दुर्जनासी व्यवहार केला पाहिजे. म्हणजेच कुत्र्यासी वैर केल्यास कुत्रे पाय काटते म्हणजेच चावते आणि कुत्र्याशी जास्त प्रेम केल तर ते तोंड चाटते. जसे कुत्र्याचे काटणे चांगले नाही त्याचप्रमाणे त्याचे तोंड चाटणेही चांगले नाही. म्हणून कुत्र्यासी जसे आपण उदासिन भावनेने वागतो तसे दुर्जनासी वागले पाहिजे.

सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की, दुर्जनाच्या संगतीत जिवंतपणी दुःख ही दुःख आहे व मृत्यूनंतर नरकाची प्राप्ती आहे. म्हणून दुर्जनाची संगती टाळून सज्जनाची संगती धरली पाहिजे. म्हणून मूळ अभंगामध्ये शेवटच्या चरणामध्ये संत बहेणाबाई म्हणतात

**बहेणी म्हणे संग आपूलेसे करी । म्हणोनी विचारी साधू जना ।।**

जो जशी सज्जनाची किंवा दुर्जनाची संगती करतो त्या प्रमाणे तो सज्जन किंवा दुर्जन होतो, जो सज्जनाच्या संगतीत जातो तो सज्जन होऊन या जगात सुख, समाधाने जीवन जगतो. मृत्यूनंतर सद्गतीला जातो, परंतु जो दुर्जनाच्या संगतीत जातो तो दुर्जन होतो. त्यामुळे या जगात दुःख भोगून दुर्गतीला जातो. म्हणून आपण या जगात दुःख भोगून दुर्गतीला जाऊ नये, असे वाटत असेल तर त्यासाठी सज्जनांची म्हणजेच साधूसंताची संगती धरली पाहिजे, जसे तुकाराम महाराज देखील म्हणतात...

**जीवन हे मुक्त नर झाले पावन । त्यजावे दुर्जन संगती ही ।।**



आपणास जर मुक्त व्हायचे असेल तर सर्वात पहिले दुर्जनाची संगती त्यागली पाहिजे व त्यानंतर सज्जनाची संगती धरली पाहिजे. सज्जनाची, चांगल्याची संगती धरल्यानंतर काय होते तर तुलसीदास महाराज उदाहरण देतात...

**तुलसी लोहा काठ संग चलत फिरत जल माही ।**
**बडे न डूबन देत है जाकी पकडे बाही ।।**

नावेला लावलेले किंवा नावेत टाकलेल लोखंड जस डूबत नाही. त्याच प्रमाणे मोठ्याच्या, साधूसंताच्या सानिध्यात डुबन्याची म्हणजेच अधोगतीला जाण्याची भिती राहत नाही. एवढेच नव्हे तर लहान देखील मोठ्याच्या संगतीने उंच पदाला जातो जसे उदाहरण दिले...

**भले नरनके संगसे निच उत्तम पद पाय ।**
**जीमी पिपिलीका पुष्पसंग ईश शीश चढ जाय ।।**

पुष्पाच्या म्हणजेच फुलाच्या संगतीने जशी अळीई ईश्वराच्या म्हणजेच मूर्तीच्या डोक्यावर जाते त्याच प्रमाणे चांगल्याच्या संगतीने लहान व्यक्ती देखील उंच पदावर जाते. चांगल्याच्या संगतीने केवळ उंच पदच मिळते असे नाही तर...

**मती किरती गती भूती भलाई । जब जेही जतन जहाँ जेइ पाई ।**
**सो सब जानब सतसंग प्रभाउ । लोकह बेद न आन उपाउँ ।।**

एखाद्याला सद्बुद्धी, किर्ती, सद्गती, ऐश्वर्य प्राप्त होऊन त्याचे कल्याण झाले असेल तर समजावे की, हा सर्व कोणत्या ना कोणत्या जन्मातील संत संगाचा प्रभाव आहे. ज्ञानी लोक वेद आदि देखील सांगतात की, हे सर्व प्राप्त होण्यासाठी संतसंगती हाच एक उपाय आहे. संत बहेणाबाईने शेवटच्या चरणामध्ये *''म्हणोनी विचारी साधूजना''* साधू संताच्या सानिध्यात राहण्याचा जो उपदेश केला तो देखील यामुळे की, संताच्या सानिध्यात लाभही लाभ आहे. संताच्या सानिध्यात सर्वात मोठा

लाभ कोणता असेल तर तो म्हणजे...

**संतसंगे शुद्ध होय चित्त वृत्ती । लागेल निवृत्ती संतसंगे ।।**
**यालागी तयाचे करावे दास्यत्व । तेणे निजतत्व सापडेल ।।**

संताच्या संगतीने चित्त शुद्ध होते. चित्त शुद्ध झाल्यामुळे मन विषय विकारापासून निवृत्त होते. मन विषय विकारापासून निवृत्त झाल्यामुळे त्याला निजतत्व म्हणजेच आत्मतत्व म्हणजेच स्वस्वरुपाची प्राप्ती होते अजून संत बहेणाबाई म्हणतात...

**संत संगे तुज सापडेल निज । संत संगे गुज प्रगट दिसे ।।**
**संत संगे दृष्टी पडेल स्वरुपी । संत संगे स्वल्पी मोक्ष जोडे ।।**

संताच्या संगतीने निज तत्व म्हणजेच आत्मतत्त्वांची ओळख होईल. संताच्या संगतीने गुज म्हणजे गुह्य गुप्तज्ञान, गुप्त परमात्मा प्रगट होईल. संताच्या संगतीने स्वस्वरुपावर दृष्टी पडेल म्हणजेच स्वस्वरुपाची ओळख होईल. थोडक्यात म्हणजे संत संगतीने आत्मा परमात्म्याची ओळख होईल त्यामुळे अगदी सहज मोक्षाची प्राप्ती होईल म्हणजेच जीव जन्ममरणाच्या चक्रापासून मुक्त होईल. म्हणून आपणास मुक्त व्हायचे असेल तर त्यासाठी अंतिम उपदेश संत बहेणाबाई करते...

**संत संगतीचा महिमा अद्‌भूत । होती ज्ञानवंत सत्वगुणी ।।**
**बहेणि म्हणे संत दर्शनेची मोक्ष । अनुभव प्रत्यक्ष पाहे याचा ।।**

संत संगतीचा महिमा खूप अद्‌भूत आहे, संत संगतीने सत्वगुणी ज्ञानी होतात. ज्ञानाने व संत दर्शनाने पापचा नाश झाल्यामुळे जीव मुक्त होतो, याचा अनुभव अनेकांनी घेतला. आम्हीही घेतला. आता आपली पाळी आहे. आपणास जन्ममृत्यूच्या चक्रापासून मुक्त व्हायचे असेल तर त्यासाठी दुर्जनांची संगती टाळली पाहिजे व सज्जनाची, साधू-संतांची संगती धरली पाहिजे. दुर्जनाची संगती तर पदोपदी मिळते. परंतु सज्जनांची संगती अत्यत दुर्लभ आहे. जसे भगवान शिव देखील म्हणतात...



**गिरीजा संत समागम सम लाभ न कुछू आन ।**
**बीनू हरि कृपा न होई सो गावही बेद पुराण ।।**

संताच्या संगतीसमान या जगात दुसरा कोणताच लाभ नाही, परंतु तो लाभ भगवंताच्या कृपेशिवाय मिळत नाही. म्हणून भगवंताकडे प्रार्थना करा की, हे प्रभू, आम्हाला संताची संगती दे व आमच्या मुखात रात्रंदिवस तुझे नाम येऊ दे. हे प्रभू अशी कृपा कर

**अब प्रभू कृपा करहू यही भाँती ।सब तजी भजन करहू दिन राती ।**
**जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।**
**जय रघुनंदन जय सीयाराम । ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।**
**रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।**
**श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।**
**विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।**
**दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।**
**आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।**

**ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव**
**गोपाल कृष्ण भगवान की जय**
**श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन**
**सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय**
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय**